# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग शासन निर्णय :- GR-ESR-२०१०/३०७/प्र.क्र. ४०/२०१० ता. क. १, दिनांक ०४.०६.२०१० अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार नागपूर महानगरपालिकेस पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल तयार करणे अनिवार्य आहे. यानुसार वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ करिता नागपूर शहराचा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान संस्था (निरी) यांचेमार्फत तयार करण्यात आला असून पर्यावरण स्थितीदर्शक अहवालास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**{सार्व. आरोग्य अभि. विभाग}**

**टिप:-** वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ करीता राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान संस्था (निरी) यांचेमार्फत तयार करण्यात आलेला पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल प्रत नस्तीत संलग्नीत आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 36/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 01/08/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार अधिक्षक अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग शासन निर्णय GR-ESR-२०१०/३०७/प्र.क्र. ४०/२०१० ता. क. १, दिनांक ०४.०६.२०१० अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार नागपूर महानगरपालिकेस पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल तयार करणे अनिवार्य आहे. यानुसार वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ करिता नागपूर शहराचा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान संस्था (निरी) यांचेमार्फत तयार करण्यात आला असून पर्यावरण स्थितीदर्शक अहवालास मंजूरी प्रदान करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.